# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : तक्रार क्र -७८७/२०२१

**तक्रारकर्ता,** श्री.लक्ष्मणदत्त जे. पंत
४बी/४०६, मातोश्री, कॉम्पलेक्स
विम्को नाका, गावदेवी रोड, अंबरनाथ (प), जि.ठाणे ४२१ ५०५

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
सहा.नगररचनाकार, नगररचना विभाग
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
सहा.नगररचनाकार, नगररचना विभाग
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ
ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २८.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ८.१.२०२१ | ----- | २.३.२०२१ | १२.३.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.३०.४.२०२१ रोजीच्या अर्जान्वये "माहिति मिळालेली नाही." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २८.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. विशाल पी. सावंत हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" (*Regarding Reservation Land bearing no.४४ which is reserved for shopping center & vegetable Market in the Draft plan of Ambernath Municipal Council situated at Village Khojkjuntavli in Ambernath west. District - Thane.*)"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "विहित मुदतीत माहिती प्राप्त झालेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

तक्रारकर्ता अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे निवेदन केले की, जन माहिती अधिकारी यांनी दि.८.२.२०२१ रोजीच्या पत्राद्वारे तक्रारकर्ता यांनी मागणी केलली माहिती नाकारली होती. मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने व त्यांनी सदर माहिती पुरविण्यास आक्षेप घेतला असल्याने माहिती पुरविणे शक्य नाही असे कळविले आहे. त्याविरुध्द करण्यात आलेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलिय अधिकारी यांनी दि.१२.३.२०२१ रोजी आदेश पारित करून, "अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक नसून सर्वसाधारण स्वरूपाची आहे. सबब माहिती विहित शुल्क आकारून ८ दिवसांत देण्यात यावी." असे आदेश पारित केले. या आदेशाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२२.३.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारांना एकूण रु.१३८/- नगरपरिषद फंडात जमा करण्याबाबत कळविले. मात्र, तक्रारदारांनी सदरची रक्कम भरणा न केल्यामुळे त्यांना सदरची माहिती देण्यात आलेली नाही.

या प्रकरणात प्रथम अपिलिय अधिकारी यांनी माहिती देण्याबाबत आदेश पारीत केलेला आहे. मात्र, त्यासाठी शुल्क आकारण्याचे आदेश पारित केले. वास्तविक सदर माहिती ही विहित केलेल्या ३० दिवसांच्या कालावधीमध्ये पुरविण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांनतरच्या माहितीसाठी शुल्क आकारणे आवश्यक नाही. ती नि:शुल्क पुरविणे आवश्यक आहे. यास्तव विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना पुढील १ आठवडयात नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या आदेशात याप्रमाणे बदल करण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, नगररचना विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती पुढील १ आठवडयांत नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ मे, २०२४

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**